ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारतीय विकासात कृषी क्षेत्राची भूमिका

**अंत्रे मनिषा निवृत्ती[1], डॉ. राजेंद्र य. शिंदे[2]**

[1] *संशोधक*

[2] *मार्गदर्शक*

*अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र : पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर, मु. पोस्ट – लोणी, ता – राहाता, जि – अहमदनगर*

***Corresponding Author:* अंत्रे मनिषा निवृत्ती**

**DOI - 10.5281/zenodo.14885670**

***गोषवारा:***

*आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे देशांमधील वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण. भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार सप्टेंबर २०२२ मध्ये जगातील ५ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होती. परंतु 2023 पर्यंत, भारत हा जगातील सातव्या क्रमांकाचा व्यावसायिक सेवा निर्यात करणारा देश आहे. जागतिक कृषी क्षेत्रात भारताचा वाटा एक प्रमुख देश आहे, ज्याचा एकूण GDP च्या 18% वाटा आहे. 2022-23 मध्ये भारताची कृषी निर्यात एकूण USD 53.1 अब्ज होती. सेवांमधील जागतिक व्यापारातील ४.६% वाटा आहे. भारताच्या सेवा निर्यातीत 27% वाढ झाली आहे. २०२२ नुसार, भारताचे वार्षिक सकल उत्पन्न (जीडीपी) ८५४.७ अब्ज डॉलर एवढे आहे. जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीन पाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताचा आर्थिक विकासदर २००६-०७ ह्या आर्थिक वर्षात ९.४% एवढा होता. परंतु अतिशय मोठ्या लोकसंख्येमुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१ डॉलर एवढेच आहे. जागतिक बँक भारताची "अल्प-उत्पन्न असणारी अर्थव्यवस्था" अशी गटवारी करते.*

***महत्वाचे शब्द:* *कृषी, निर्यात, आयात, विकास***

**प्रस्तावना:**

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच विविधता दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन-तृतियांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो. शेतीच्या एकूण उत्पन्नात भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. २००५ मध्ये शेती व लाकूडतोड, जंगल संवर्धन, आणि मासेमारी अशा इतर संबधित व्यवसायांचा भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नामध्ये १८.६% इतका वाटा होता, आणि या व्यवसायांमध्ये कामगारांपैकी ६०% लोक काम करत होते. अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे आणि अलिकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावायला लागला आहे. भारत हा अति-कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्मतंत्रज्ञान, दूरसंचार, जहाजनिर्माण, विमाननिर्माण, आणि पर्यटन अश्या अनेक क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्रोतांचा वापर करून माहिती संकलित केली आहे. शासनाचे अहवाल , दस्तऐवज, मासिके , पुस्तके व इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. भारत देशाच्या विकासातील शेती क्षेत्राचा आढावा घेणे .
२. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्रांच्या विकासाचा अभ्यास करणे.
३. आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारतीय कृषी क्षेत्राची भूमिका अभ्यासणे.

**भारताच्या विकासात आंतरराष्ट्रीय व्यापारातील क्षेत्रांची भूमिका:**

**कृषी क्षेत्र:**

कृषी (शेती) हाच अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा घटक आहे व भारताच्या अर्थ-सामाजिक विकासामध्ये ह्या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीला नेहेमी प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सरकारकडून शेतकऱ्यांना अनुदाने, कर्ज व इतर सोई वेळोवेळी पुरवण्यात आल्या. भारतातील हरितक्रांतीपासून शेती तंत्रज्ञान व सिंचनपद्धती यामध्येही सतत सुधारणा होत आहे. यामुळे, शेतीचे दर-एकरामागील उत्पन्न १९५० पासून सतत वाढत आहे. आंतरराष्ट्रीय उत्पन्नांची तूलना केली तर भारतातील शेतीची उत्पन्नक्षमता जगातील सर्वात जास्त उत्पन्नक्षमतेच्या सर्वसाधारणपणे ३०% ते ५०% एवढीच असते असे दिसते. चालू कालावधी साठी कृषी प्रमुख वस्तूंची निर्यात पहिली तर त्यात वाढ झालेली आढळून येते.

**चालू कालावधीसाठी कृषी प्रमुख वस्तूंची निर्यात :**

| S. No | कमोडिटी | एप्रिल-मार्च 2023 | एप्रिल-मार्च 2024 | %वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | सागरी उत्पादने | 8,077.98 | ७,३७२.०० | -8.74 |
| 2 | तांदूळ - बासमोती | ४७८७.६५ | ५८४३.३० | 22.05 |
| 3 | तांदूळ (बासमोती व्यतिरिक्त) | ६३५६.७१ | ४५७३.४१ | -28.05 |
| 4 | मसाले | ३७८५.३६ | ४२४८.५६ | १२.२४ |
| ५ | म्हशीचे मांस | ३१९३.६९ | ३७४३.२६ | १७.२१ |
| 6 | साखर | ५७७०.८३ | २८२४.७४ | -५१.०५ |
| ७ | तेल जेवण | १६०१.७२ | १७१३.९८ | ७.०१ |
| 8 | मिश्र प्रक्रिया केलेले आयटम | १४२१.६४ | १६५३.३५ | १६.३० |
| ९ | कॉफी | 1146.18 | १२८६.२८ | १२.२२ |
| 10 | ताजी फळे | ८६४.६२ | 1146.60 | ३२.६१ |

स्रोत: DGCIS

चालू कालावधीसाठी चे शेती प्रमुख वस्तूंची निर्यात पाहता सागरी उत्पादने एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 8,077.98 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात कमी होऊन ती 7,372.00 एवढी आहे.तांदूळ बासमती एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 47887.65 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात वाढ होऊन ती 5843.30 एवढी आहे. तांदूळ बासमती व्यतिरिक्त एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 6356.71 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात कमी होऊन ती 4573.41 एवढी आहे. मसाले एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 3785.36 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यातवाढ होऊन ती 4248.56 एवढी आहे. म्हशीचे मांस एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 3193.69 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात वाढ होऊन ती 3743.26 एवढी आहे. साखर एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 5770.83 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात कमी होऊन ती 2824.74 एवढी आहे. तेल जेवण एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 1602.72 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात वाढ होऊन ती 1713.98 एवढी आहे. मिश्र प्रक्रिया केलेले आयट्म एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 1421.64 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात वाढ होऊन ती 1653.35 एवढी आहे.कॉफी एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 1146.18 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात वाढ होऊन ती 1286.28 एवढी आहे.ताजी फळे एप्रिल- मार्च 2023 ची निर्यात 864.62 आहे. एप्रिल-मार्च 2024 ती निर्यात वाढ होऊन ती 1146.60 एवढी आहे.

**औद्योगिक क्षेत्र:**

कारखान्यांच्या एकूण उत्पादनानुसार क्रमवारीत भारताचा जगात १४ वा क्रमांक आहे. भारताच्या कामगारांमधील १२% लोक औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करतात. औद्योगिक क्षेत्राचे उत्पन्न भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या २८% एवढे आहे. आर्थिक सुधारांनतर भारतीय उद्योगांशी विदेशी उद्योगांची स्पर्धा वाढली. याचबरोबर सार्वजनिक उद्योगांसाठी राखून ठेवलेली बरीच क्षेत्रे खाजगी उद्योगांसाठी खुली करण्यात आली. तसेच बऱ्याच सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरणही करण्यात आले. ह्यामुळे उद्योगांमधील स्पर्धा वाढून भारतीय उद्योगांची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आणि जलद गतीने वापरल्या जाणाऱ्या मालाच्या उत्पादन क्षमतेतही प्रचंड वाढ झाली.भारताच्या खाजगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये आर्थिक सुधारांपूर्वी औद्योगिक घराणेशाहीचा बराच प्रभाव होता. विदेशी उद्योगांना टक्कर द्यायला ह्या उद्योगपतींना राजकारण्यांशी संबंध राखून त्यांच्याकडून उद्योगांसाठी सवलती घेण्याची गरज पडे. अर्थव्यवस्था खुली झाल्यापासून अशा विशेष सवलती अथवा अनुदाने मिळणे कमी झाले. परंतु यामुळे, विदेशी उद्योगांच्या तूलनेत मागे न पडता, उलट भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढत आहे .

**भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे:**

आंतरराष्ट्रीय व्यपाराचे अनेक फायदे आहेत. उत्पन्न वाढले आहे , स्पर्धा कमी झाली , उत्पादनाचे अधिक आयुष्य , सुलभ रोख प्रवाह व्यवस्थापन , उत्तम धोका व्यवस्थापन , चलन विनिमयातून फायदा होतो ,निर्यात वित्तपुरवठा प्रवेश ,अतिरिक्त मालाची विल्हेवाट लावणे ,वर्धित प्रतिष्ठा , स्पेशलायझेशनची संधी , नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, कायदेशीर आव्हाने अशा अनेक प्रकारचे फायदे आंतरराष्ट्रीय व्यवसायाचे आहेत.

**निष्कर्ष:**

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे बाजार पेठांचा विस्तार होणार आहे.शेतीच्या उत्पादन प्रक्रियेत

नवीन शोध लागतात. व्यवहार तोलाची समस्या दूर होण्यास मदत होते. उत्पादन घटकांचा महत्तम उपयोग होतो.उत्पादन साधनांचा महत्तम वापर होण्यास मदत होते.वस्तू व सेवांचे उत्पादन वाढून उपभोग वाढण्यास मदत होते.जलद आर्थिक विकास होण्यास मदत होते. देशाच्या भांडवल निर्मितीस मदत होते.

**संदर्भ:**

१. भारताची अर्थव्यवस्था
२. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र : सिद्धांत आणि धोरण
३. https://en.wikipedia.org/wiki/Economy_of_India
४. https://www.commerce.gov.in/about-us/divisions/export-products-division/export-products-agriculture/